: प्रकरण पहिले :

## प्रकरण पहिले — १ ते ५

## प्रास्ताविक


| | | |
|---|---|---|
| १] | प्रास्ताविक | १ |
| २] | विवेचनासाठी इ.स. १८४३ ते इ.स. १९३४ हाच कालखंड का? | १ |
| ३] | प्रारंभिक नाटकातील संगीताची जडणघडण | २ |
| ४] | विष्णुदास भावे यांच्या नाट्यनिर्मितीची प्रेरणा आणि स्वरूप. | २ |
| ५] | संगीत नाटकातील नवे पर्व | २ |
| ६] | किर्लोस्करोत्तर नाटकांतील संगीतामधील विविध प्रयोग. | ३ |
| ७] | सुवर्णयुगाचा कालखंड | ३ |
| ८] | संगीत नाटकांचा अखेरचा अंक | ४ |
| ९] | संगीत नाटकाच्या पिछेहाटीची मीमांसा | ४ |
| १०] | उपसंहार | ४ |


— ००० —

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

### (१) प्रास्ताविक

संगीत या श्रेष्ठ कलेचा अुपयोग करून मराठी रंगभूमीवर संगीत नाटकांनी अेक सुवर्णयुग निर्माण केले. त्या सुवर्णयुगातील स्वरांचा गंध आजही दरवळतो आहे. तेव्हा स्वरांचा हा रम्य चमत्कार अुलगडून पाहावा असे मनात आले. मराठी रंगभूमीवर संगीत नाटकांनी जो देदीप्यमान अितिहास घडविला त्यास नाटककार, संगीत दिग्दर्शक आणि गायकनट या सर्वांचे साहाय्य झाले आहे असे दिसून येते. या सर्वांच्या कामगिरीचा प्रामुख्याने सांगीतिक दृष्टिकोनातून विचार करण्याचा येथे मी प्रयत्न केला आहे.

रंगभूमीला कीर्तिशिखरावर नेअून पोहोचविणाऱ्या याच संगीताचा पुढे अतिरेक झाला. त्याच सुमारास बोलपटाची निर्मिती (१९३१) झाली आणि संगीत नाटकांचा हा सुंदर अिमला कसा कोसळून पडला याची चिकित्सा करून शेवटी मराठी संगीत नाटकाचे भवितव्य काय याची मीमांसा करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

### (२) विवेचनासाठी अि.स. १८४३ ते अि.स.१९३४ हाच कालखंड का?

या प्रबंध लेखनासाठी मी अि.स. १८४३ ते अि.स. १९३४ हा कालखंड निवडलेला

आहे. १९२४ नंतरही संगीत हे रंगभूमीवरून नष्ट झाले नाही तर जुन्या संगीत नाटकांचे प्रयोग आणि संगीताच्या बाबतीत नवनवीन उपक्रम हे चालूच होते. परंतु ज्या संगीत नाटकाच्या इतिहासातील सुवर्णयुगाच्या अस्ताबरोबर एक महत्त्वाचा टप्पा संपला तेथपर्यंतच म्हणजे इ.स. १९२४ पर्यंत मी विस्तारभयास्तव विवेचनाची मर्यादा घालून घेतली आहे.

(२) प्रारंभिक नाटकातील संगीताची जडणघडण

मराठी नाटकातील संगीताची जडणघडण कशी झाली हे बघताना आधी संगीत ही एक श्रेष्ठ कला कशी आहे, तिचे मानवी जीवनातील स्थान काय आणि शेवटी संगीताचे नाटकातील प्रयोजन काय या गोष्टींचा विचार मी केला आहे.

त्यानंतर महाराष्ट्रातील 'दशावतार', 'ललित', 'कीर्तन', 'तमाशा' वगैरे लोककलाप्रकारांतील संगीताची मराठी नाटकातील संगीताच्या जडणघडणीस कशी मदत झाली याचा परामर्श मी दुसऱ्या प्रकरणात घेतला आहे.

(४) विष्णुदास भावे यांच्या नाट्यनिर्मितीची प्रेरणा आणि स्वरूप

तिसऱ्या प्रकरणात विष्णुदास भावे यांनी कोणत्या कारणांनी प्रेरित होऊन 'सीतास्वयंवर' (१८४३) या संगीत नाटकाची निर्मिती केली याचा ऊहापोह केला आहे. [तसेच त्यांनी लोककलाप्रकारांतील कोणते नाट्यतंत्र आणि नेमकी कोणती सांगीतिक वैशिष्ट्ये स्वीकारली ते पाहिले आहे. आणि शेवटी विष्णुदास भावे यांच्या नाटकांनी केलेल्या कार्याचा परामर्श घेतला आहे.

(५) संगीत नाटकातील नवे पर्व

त्यानंतर मराठी रंगभूमीवर 'शाकुंतल' नाटकाचा इ.स. १८८० मध्ये प्रयोग करून एका नव्या युगाला प्रारंभ करणाऱ्या अण्णासाहेब किर्लोस्करांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाट्यसंगीताची म्हणून जी वैशिष्ट्ये सांगितली जातात (परप्रांतीय गीतप्रकारांच्या चालींचा उपयोग, कीर्तन,

लावणीच्या चालींना दिलेले शास्त्रोक्त गायनाचे वळण आणि भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर व मोरोबा वाघोलीकर या गायकनटांचे आगमन ) त्या वैशिष्ट्यांचा सविस्तर विचार केला आहे.

अण्णासाहेबांच्या नंतरचे प्रसिध्द नाटककार म्हणजे गो.ब.देवल हे होत. त्यांच्या नाट्यकर्तृत्वाचा विचार करून त्यांनी अण्णासाहेबांची परंपरा पुढे कशी चालविली हे पाहिले आहे. त्याचप्रमाणे पुढील नाटककारांनी त्यांना आदर्शस्थानी का मानले असावे याचा विचार केला आहे.

(६) <u>किर्लोस्करोत्तर नाटकांतील संगीतामधील विविध प्रयोग</u>

त्यानंतरच्या पाचव्या प्रकरणात मराठी संगीत रंगभूमीवर पां.गो.यवतेश्वरकर, मा.ना.पाटणकर आणि श्री. कृ. कोल्हटकर या नाटककारांनी जे संगीताचे विविध प्रयोग केले त्यांचा परामर्श घेतला आहे.

श्री.कृ.कोल्हटकरांनी आपल्या नाटकाकरिता उर्दू, पार्शी नाटकांतील आकर्षक चाली चोखंदळपणे स्वीकारल्या आणि नाट्यसंगीतात नाविन्य आणले. अशा संगीताने युक्त अशी पदे भाऊराव कोल्हटकर, नानासाहेब जोगळेकर वगैरे श्रेष्ठ गायकांनी सादर करूनही कोल्हटकरांची नाटके यशस्वी का झाली नाहीत याची मी चिकित्सा केली आहे.

(७) <u>सुवर्णयुगाचा कालखंड</u>

या पुढील कालखंड म्हणजे मराठी रंगभूमीवरील 'सुवर्णयुगाचा' कालखंड होय. या सुवर्णयुगात कृ.प्र.खाडिलकर, रा.ग.गडकरी यांच्यासारखे श्रेष्ठ नाटककार, भास्करबुवा बखले आणि गोविंदराव टेंबे यांच्यासारखे थोर संगीत दिग्दर्शक, बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांच्यासारखे श्रेष्ठ गायकनट रंगभूमीवर आले आणि त्यांनी संगीताने रंगभूमीवर 'सुवर्णयुग' साकार केले. ते सुवर्णयुग या सर्व श्रेष्ठ मंडळींनी कसे साकार केले, म्हणजे या कालखंडातील नाटकांतील संगीताचे स्वरूप कसे होते, बालगंधर्व व केशवराव भोसले या गायकनटांनी ते संगीत रंगभूमीवर कसे आविष्कृत केले [illegible]

आणि 'संयुक्त मानापमान' (१९२१) नाटकाचा प्रयोग न भूतो न भविष्यति कसा ठरला या सर्व गोष्टींचा विचार आणि मीमांसा करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

(८) संगीत नाटकांचा अखेरचा अंक

पुढील प्रकरण (प्रकरण क्र. ७) म्हणजे गाजलेल्या संगीत रंगभूमीवरील अखेरचा कालखंड होय. हा कालखंडसुध्दा संगीताने निनादून गेला होता. अनेक नाटककारांच्या (क्रांतिकारक वीर वामनराव जोशी, अितिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे वगैरे) नाटकांनी, गायनाचार्य वझेबुवा, मास्तर कृष्णराव या थोर संगीत दिग्दर्शकांच्या संगीताने आणि अनेक गायकनटांच्या (बापूसाहेब पेंढारकर, रामभाऊ कुळकर्णी वगैरे) गायनाने रंगभूमी गजबजून गेली होती. या अखेरच्या अंकातच रंगभूमीच्या वैभवाला ओहोटी लागल्याचे निदर्शनास येते ; कारण सामान्य नाटककारांच्या सामान्य नाटकांची निपज भरपूर प्रमाणात झाल्याचे दिसून येते. या काळातील नाटककारांच्या नाटकांतील संगीताचे स्वरूप आणि गायकनटांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे.

(९) संगीत नाटकाच्या पिछेहाटीची मीमांसा

'संगीत रंगभूमीच्या पिछेहाटीची कारण-मीमांसा' या प्रकरणात संगीत रंगभूमीची पिछेहाट का झाली त्या (नाटककारांवर पडलेली संगीताची जबरदस्त मोहिनी, संगीतासाठी झालेली संगीताची योजना, रंगभूमीवर वाढलेले गायकीचे स्तोम, वन्समोअरने रंगभूमीला आलेली कळा, रसिक श्रोत्यांची अतिरिक्त संगीतलोलुपता वगैरे) कारणांचा विस्तृत विचार केला आहे. या सर्व कारणांच्या जोडीला बोलपटांची निर्मिती याच सुमारास होअून तिने संगीत रंगभूमीला पुरते नेस्तनाबूत कसे केले आणि संगीत नाटके करणाऱ्या विविध कंपन्या बोलपटांच्या आकर्षणाने कशा कोलमडून पडल्या याचे विवेचन केले आहे.

(१०) अुपसंहार

शेवटी 'अुपसंहारा'मध्ये सर्व प्रकरणांचा अेकत्रित असा सारांशरूपाने विचार करून

मराठी संगीत नाटकांनी मराठी रंगभूमीला कोणते योगदान दिले याचे विवेचन केले आहे. आणि शेवटी संगीत रंगभूमीचे भवितव्य काय या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

-०-०-०-०-